INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Impact Factor – 6.261

ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

## Multidisciplinary International E-research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

November-2018 Special Issue – LXXIII

Chief Editor

Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

Executive Editors :

Prof. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane-Nile, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

RESEARCHJOURNEY

This Journal is indexed in :

- University Grants Commission (UGC)
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.researchjourney.net

okmanya
Dist. Chandrapur

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 73 : UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
November-2018


| | | | |
|---|---|---|---|
| 58 | मारुती चितमपल्ली यांच्या 'चकवाचांदण' आत्मचरित्रातील वनवैविध्य | प्रा. सचिन पाटील | 301 |
| 59 | लोकसाहित्य आणि ग्रामीण साहित्य:एक अनुबंध | डॉ.अनिल गर्जे | 304 |
| 60 | भारतीय लोकशाहीची पायाभरणी आणि ब्रिटीशकालीन कायदे-एक अभ्यास | डॉ.संभाजी पाटील | 309 |
| 61 | पंचवार्षिक योजनेमध्ये गृहनिर्माण धोरण | प्रा. नरेश इंगळे | 314 |
| 62 | जनाबाईचे अभंग:एक अभ्यास | डॉ.प्रवीण कारंजकर | 319 |
| 63 | केशवसुत संप्रदायाची कविता | डॉ.भूषण बंड | 323 |
| 64 | विनोबा – जमनालाल बजाज संबंध | डॉ.दीपक लोणकर | 328 |
| 65 | उत्तम कांबळे यांच्या साहित्याच्या प्रेरणा | प्रा.माधव सूर्यवंशी | 332 |
| 66 | बचत गट आणि महिला सक्षमीकरण | प्रा.श्री.चंद्रकांत मोरे | 336 |
| 67 | सरदार कदमबांडे घराण्याचा संक्षिप्त परिचय | डॉ.शिवाजी वाघमोडे | 339 |
| 68 | आंतरराष्ट्रीय राजकारणावरील अशासकीय संघटनांचा वाढता प्रभाव : राष्ट्रासाठीचे आव्हान | डॉ. दिलीपसिंह निकुंभ | 343 |
| 69 | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या साहित्यातील सामाजिक,सांस्कृतिक व राष्ट्रीय विचार | प्रा.एस.आर.खैरनार | 351 |
| 70 | भारतीय संविधानाचे शिल्पकार : डॉ.बाबासाहेब आंबेडकर | प्रा.विनय वाघ व डॉ.सुरेंद्र मोरे | 355 |
| 71 | पुनर्विचार : काही प्रश्नांचा धांडोळा | प्रा. लालबा दुमटकर | 361 |
| 72 | नव्वदोत्तर विदर्भातील शेतकरी चळवळीच्या नेतृत्वाचे समीक्षात्मक अध्ययन | प्रा.राजू लिपटे | 364 |
| 73 | भंडारा जिल्ह्यातील तापमानातील बदलाचा पर्यावरणीय अभ्यास | प्रा.श्रावण कापगते | 367 |
| 74 | अण्णाभाऊ साठे यांच्या कादंबरीतील स्त्री नायिकांचा समाजशास्त्रीय अभ्यास | प्रा.शरद गायकवाड | 373 |
| 75 | प्रवरेचा भगीरथ पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील | डॉ. चंद्रकांत रुद्राक्षे | 377 |
| 76 | तणाव : मनातील द्वंद्वाचा अविष्कार | डॉ. मनीषा मुलकलवार व डॉ. प्रमोद मुलकलवार | 382 |
| 77 | भारतीय लोकशाही : पंचायतराज | डॉ.एन.बी.आघाव | 386 |
| 78 | राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात स्त्री संरक्षणासाठी केलेले कायदे | डॉ. डी.एम. चौधरी | 390 |
| 79 | भारतीय लोकशाही प्रणाली आणि प्रांतवाद | डॉ. अरुण शेळके | 394 |
| 80 | तापलेले दिवस : आत्मशोधातून आलेली कविता | प्रा. हेमंतकुमार बागडे | 400 |
| 81 | आदिवासींचे वीर | डॉ. अंजली मस्करेन्हस | 404 |
| 82 | ई-ग्रंथालय बी. एड् प्रशिक्षणार्थ्यांसाठी अद्यावत शिक्षण व प्रशिक्षण घेण्यासाठी प्रभावी उपाय | प्रा. डॉ.दादासाहेब पवार | 409 |
| 83 | रामनाथ चव्हाण यांची कादंबरी 'निळी पहाट' | प्रा. गौतम बनसोडे | 412 |
| 84 | अश्वघोषाच्या साहित्यातील बौद्ध तत्त्वज्ञान | श्रीमती बकुल कांबळे | 418 |
| 85 | जागतिकीकरणाच्या प्रभावातील १९९० नंतरची मराठी कादंबरी | प्रा. प्राची जोशी | 426 |
| 86 | अण्णाभाऊंच्या साहित्यातील सामाजिक विचार | डॉ. प्रल्हाद होंडे | 435 |
| 87 | भारतीय राज्यघटनेचा सरनामा : एक विश्लेषणात्मक अभ्यास | डॉ. संभाजी पाटील | 438 |
| 88 | नव्वदोत्तर कथालेखकांच्या कथांतील आशयसूत्रे | डॉ. सहदेव चव्हाण | 445 |
| 89 | औरंगाबाद जिल्ह्यातील जलप्रणाली | डॉ. तुकाराम गजर | 450 |
| 90 | राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या विस्ताराची व्यूह रचना | प्रा. प्रदीप जगताप | 453 |




Scanned with OKEN Scanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 73 :
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
November-2018

307

# विनोबा – जमनालाल बजाज संबंध

डॉ. दीपक पां. लोणकर
लोकमान्य महाविद्यालय वरोरा.
जि. चंद्रपूर (महा.) ४४२९०७
Email- deepakmd.lonkar@gmail.com
Mob. 9657336994

**प्रस्तावना :–**

विनोबांना राजकारण करायचे नसल्यामुळे ते समाजकारण करू लागले त्यामुळे देशात भूदानाच्या निमित्याने फिरतांना त्यांचा बराच प्रवास झाला. या प्रवासाच्या काळात बऱ्याच राजकीय नेत्यांशी त्यांचे संबंध आले. तसेच विनोबा हे आश्रमवासी असल्यामुळे अनेक पुढारीही त्यांच्याजवळ भेटीला येत असत. त्यांच्या कार्यामुळे विनोबांची देशाच्या समाजकारणावर एक वेगळी छाप पडून त्यांचे महत्व आपोआप वाढले होते. तसेच म.गांधींचे आध्यात्मिक वारस म्हणूनही त्यांच्याकडे पाहिले जाऊ लागल्यामुळे विनोबांना भारतीय राजकारणात महत्व प्राप्त होऊन पहिला 'वैयक्तिक सत्याग्रही' म्हणून त्यांची निवड म. गांधींनी केली होती. विनोबांनी आपल्या आचार–विचारांतूनही स्वतःची एक वेगळी ओळख तत्कालीन समाज व राष्ट्रीय नेत्यांसमोर निर्माण केली. तसेच त्यांचे सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, धार्मिक इत्यादी ग्रंथासंबंधीचे अध्ययन, प्रवचने व लेखन यामुळेही जनतेची व राजकीय पुढाऱ्यांची त्यांच्याकडे पाहण्याची दृष्टी ही तत्ववादी, उत्कृष्ट वक्ता, निर्भीड सामाजिक कार्यकर्ता, भूदानाचा प्रणेता अशी तयार होऊन अनेक विषयांवर त्यांचे मार्गदर्शन घेतल्या जाऊ लागले. अनेक सरकारी योजना, पंचवार्षिक योजना व इतर महत्वाच्या योजना तसेच देशातील सामाजिक समस्या, आर्थिक प्रश्न, भाषाप्रश्न, हिंदू–मुस्लीम दंगे, निर्वासितांचा प्रश्न इत्यादी प्रश्न सोडविण्यासाठीही विनोबांचे मार्गदर्शन घेतल्या जाऊ लागले. त्यातूनच त्यांची 'राजकीय पुढाऱ्यांचा मार्गदर्शका'ची छबी तयार झाली.

आणीबाणीच्या संबंधीत भूमिकेमुळेही ते विशेष प्रसिध्दीस आले. या काळात सरकारलाही धारेवर धरण्यास त्यांनी मागेपुढे पाहिले नाही. अशा या व्यक्तिमत्वाबद्दल लोकांच्या मनात आदर वाढला. विनोबांना देश–विदेशातून त्यांच्या कार्याबद्दल पुरस्कारही मिळाले आहेत. यामुळे विनोबांची भारतीय राजकारणावर छाप पडून ते राजकारण्यांच्या दृष्टीने महत्वाची व्यक्ती बनले.

सुरूवातीच्या काळात म. गांधींशी त्यांचा संबंध आला. आश्रमी जीवनात जमनालालजी बजाज, साने गुरूजी यांच्याशी त्यांचा संबंध वाढला. तसेच तुरूंगवासाच्या काळात पं. नेहरू, काका कालेलकर, राजगोपालाचारी, राजेन्द्र प्रसाद इत्यादी स्वातंत्र्य चळवळीतील राष्ट्रीय नेत्यांशी त्यांचा संबंध आला व यातूनच त्यांच्यावर विनोबांचा प्रभाव पडला. स्वातंत्र्यानंतरच्या परिस्थितीतही जयप्रकाश नारायण, इंदिरा गांधी यांच्याशी संबंध निर्माण झाले. या दृष्टीने जमनालाल बजाज यांच्याशी त्यांचे विशेष संबंध होते.

**विनोबा – जमनालालजी बजाज संबंध :–**

म. गांधीजींच्या साबरमती आश्रमातच जमनालालजी व विनोबांचा परिचय झाला होता[१] व पहिल्या भेटीतच विनोबांचा त्यांच्यावर प्रभाव पडला त्यामुळे वर्ध्याला आश्रम स्थापन करतांना जमनालालजींनी त्यांची वर्धा आश्रमाचे संचालक म्हणून मागणी केली होती. त्यामुळे ते वर्ध्याला आले व त्यातूनच विनोबा व जमनालालजींचे संबंध दृढ झाले. बरेचदा जमनालालजी विनोबांना आध्यात्मिक व व्यवहारीक शंका विचारून

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 73 :
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
November-2018

आपले समाधान करून घेत.[२] त्यांनी विनोबांना आपला गुरू मानले. त्यांच्या विद्वत्तेचा फायदा समाजाला करून देण्यासाठी एखादे 'मासिक' सुरू करण्याचा आग्रह विनोबाकडे त्यांनी केला. त्यामुळेच 'महाराष्ट्र धर्म' हे मासिक सुरू झाले.[३] जमनालालजी आपल्या पत्नीलाही विनोबांच्याच सल्ल्याने वागून त्यांच्या सत्संगतीचा लाभ घेण्याचेही सांगतात.[४] तसेच आपल्या मुलांनाही विनोबांसारखा गुरू मिळावा म्हणून मुलांच्या शिक्षणाचा भार त्यांनी त्यांच्यावर टाकलेला दिसतो. म्हणूनच गर्भश्रीमंत जमनालालजींची मुले त्यांच्या आश्रमाच्या 'राष्ट्रीय शाळेत' शिकत होती.[५]

विनोबा व जमनालालजींचे संबंध हे कौटुंबिक स्वरूपाचे होते. ते त्यांच्या कुटुंबाचे गुरू तर होतेच पण जमनालालजींची पत्नी जानकीदेवीही त्यांना आपला लहान भाऊ मानत असे. त्यामुळे त्यांचा व्यवहारही विनोबांशी विनोदी स्वरूपाचा होता. तेव्हा या संबंधामुळेच कमलनयन बजाज यांच्या लग्नात किती वऱ्हाडी न्यायचे? यासंबंधीची विचारणा विनोबांकडे केल्या गेली होती. तेव्हा त्यांनी काही व्यक्तींची नावे सूचवितात.[६] जानकीदेवींच्या 'मेरी जीवनयात्रा' या पुस्तकालाही त्यांनी प्रस्तावना लिहून दिली होती. तसेच जमनालालजींच्या मृत्युपत्रातही सल्लागार म्हणून विनोबांचे नाव होते.[७] यावरून विनोबांचे व जमनालालजींचे संबंध कसे होते यांचा अंदाज येतो. ही गोष्ट स्वत: विनोबा देखील कबुल करताना म्हणतात की, "... जमनालालजींच्या पूर्ण परिवाराशी माझा चांगला संबंध राहिला आहे... यासाठी जमनालालजींचे आक्रमणकारी प्रेम जबाबदार आहे"[८] असे असले तरीही तत्वाच्या बाबतीत त्यांनी जमनालालजींशी तडजोड केली नाही. एकदा कन्याश्रमाच्या बाबतीत निर्णय घेण्यास उशीर झाल्यामुळे जमनालालजींना फटकारण्यासही त्यांनी कमी केले नाही.[९]

त्यामुळेच विनोबांनी सांगावे व जमनालाल बजाजांनी ते करावे असे हे संबंध होते. आश्रमासाठी योग्य जागा मिळाली नाही म्हणून जेव्हा जेव्हा विनोबांनी नवीन जागेची मागणी केली तेव्हा तेव्हा ती मागणी जमनालालजींनी पूर्ण केली होती. यामुळेच बजाजवाडी, घासबंगला, महिलाश्रम यासारखे आश्रम तयार झाले होते. याशिवाय कन्या शाळा, राष्ट्रीय विद्या मंदिर इत्यादींची स्थापना झाली होती. गोसेवेबद्दलची विनोबांची दृष्टी लक्षात घेऊन शेवटच्या काळात जमनालालजींनी गोसेवेचे काम हाती घेऊन 'गोसेवा संघ' स्थापन केला व गोसेवा संमेलनही भरविले.[११] विनोबांचे गावातील दलितोध्दाराचे कार्य लक्षात घेऊन जमनालालजींनी आपल्या मालकीचे लक्ष्मीनारायणाचे मंदिर १९२८ साली अस्पृश्यांसाठी खुले केले होते.[१२] तेव्हा त्यांच्या मार्गदर्शनामुळे ते आपल्याला मार्ग दाखवतील अशी अपेक्षा ते व्यक्त करताना त्यांच्या संपर्कात राहायला आवडेल असेही जमनालाल म्हणतात.

जसे जमनालालजी विनोबांचे ऐकत तसेच विनोबाही जमनालालजींचा आदर ठेवत. त्यांच्या विनंतीपूर्वक सूचनांचे पालनही करीत. उदा. झेंडा सत्याग्रहात जमनालालजींच्या विनंतीवरूनच आश्रमातील काही कार्येकर्ते विनोबांनी नागपूरला पाठवून ते स्वत:ही सहभागी झाले होते.[१३] जमनालालजींच्या आग्रहावरूनच त्यांनी 'महाराष्ट्र धर्म' हे मासिक सुरू केले तसेच धुळे जेलमध्ये असतांना जमनालालजींनी गीताप्रवचनाचा आग्रह धरल्यामुळे त्यांनी गीताप्रवचने दिली होती तसेच 'गीताई' या पुस्तकाचे प्रकाशकत्वही जमनालालजींनी स्वीकारण्याचे ठरविले. त्यालाही विनोबांनी मान्यता दिली होती.[१४] त्या दोघांनाही परस्परांची काळजी होती. विनोबांना कार्य करताना कुठलाही त्रास होऊ नये याची दक्षता जमनालालजी घेत. त्यासाठी ते वारंवार आश्रमात येऊन काय पाहिजे? याची विचारपूसही करतात तसेच आपल्या अनुपस्थितीत आपल्या पत्नीला पाठविलेल्या पत्रात आश्रमात पाणी नसेल तर विहीर खोदण्याची व्यवस्था करण्याच्या सूचनाही त्यांनी केल्या होत्या.[१५] विनोबांची प्रकृती बरी नाही म्हणून त्यांच्या विश्रांतीसाठी ते पवनार येथे असलेला आपला राहता बंगलाही विनोबांना देतात.[१७] याप्रमाणे

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 73 :
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
November-2018

विनोबांनाही जमनालालजींची चिंता असून २९ डिसेंबर, १९३९ रोजी पाठविलेल्या पत्रात विनोबा त्यांना आरोग्यासंबंधी काही सूचनाही करतात.[१८] धुळे जेलमध्ये असताना विनोबांचा सहवास आपल्याला लाभावा म्हणून जमनालालजींनी 'क' वर्ग मागून घेतला होता.[१९] तसेच जेलमध्ये त्यांच्या कोठडीसमोर जमनालालजींची कोठडी असल्यामुळे बराच वेळ परस्परांसोबत घालविता आला याचा मला आनंद झाला असे ते म्हणतात.[२०] नागपूर जेलमध्येही या दोघांना सोबत राहावयास मिळाले होते. यासंबंधी विनोबा म्हणतात की, "जेलमध्ये चांगले अनुभव येऊन आम्हा दोघांमध्ये चांगले संबंध निर्माण झाले, एक दुसऱ्यांसाठी प्रेम व भक्तीची भावना तयार झाली..[२१]

जमनालालजींच्या गुणांचे विनोबा नेहमी कौतुक करतात ते त्यांना गुणग्राहक मानत. वर्धेला पवित्र बनविण्याचे व गांधीजींना वर्धेला आणण्याचे फार मोठे श्रेय जमनालालजीचे आहे. असे त्यांचे मत होते.[२२] जमनालालजी निरंतर आपले आत्मपरीक्षण करतात हा त्यांचा गुण जगभरातील संपत्तीपेक्षा अधिक मूल्यवान आहे असे विनोबांना वाटे.[२३] विनोबांना जमनालालजींच्या डायरीवरून संपत्तीदान आंदोलनाची कल्पना सुचली होती. जमनालालजींच्या कार्यामुळेच विनोबा त्यांना 'संताच्या मालिकेतील होते' असे म्हणतात.[२४]

मुल्यमापन :–

जमनालालजी बजाज हे विनोबांना आपला गुरू समजत होते. जमनालालजींनीच म. गांधींसमोर वर्धेच्या आश्रमातचे संचालक म्हणून विनोबांची मागणी केली होती. विनोबा हे ऋषिपरंपरेतील आहेत अशी त्यांची समजूत होती व आश्रमी जीवनात जमनालालजींना त्यांच्या विद्वत्तेची कल्पना आल्यामुळे त्यांचा सहवास त्यांना हवासा वाटत होता. त्यामुळेच आश्रमात विनोबांना कोणताही त्रास होऊ नये, ते आश्रम सोडून जाऊ नयेत म्हणून वेळोवेळी आश्रमाची जागा बदललेली दिसून येते. विनोबांच्या ज्ञानाचा फायदा आपल्या मुलांना व्हावा व त्या माध्यमातून आपली मुले जीवनाच्या प्रवासात तयार व्हावीत अशी जमनालालजींची अपेक्षा होती. त्यामुळेच जमनालालींनी आपल्या मुलांना शिक्षणासाठी विनोबांकडे पाठविले. कोणताही मोठा नेता किंवा अधिकारी आपल्या मुलांनी बनावे अशी जमनालालजींची इच्छा नव्हती तर आपल्या मुलांना विनोबांसारखे 'फकीर' बनवायचे होते.[२५]

सत्याग्रहाच्या निमित्याने विनोबा व जमनालालजी तुरूंगात एकत्र आले त्या वेळी विनोबांच्या विद्वत्तेचा समाजाला फायदा व्हावा म्हणून त्यांनी गीताप्रवचने सांगावित असा आग्रह बजाज यांनी धरला व प्रकाशनाच्या हक्काची जबाबदारी स्वीकारली होती. गोसेवेचे कार्य जमनालालजींनी हाती घ्यावे असा सल्ला विनोबांनी देताच त्यांनी स्वतःला या कार्यात झोकून दिल्याचे दिसते.

## संदर्भ ग्रंथसूची

१. भूदान यज्ञ (साप्ता), १६ मार्च, १९६२, पृ.४
२. कित्ता
३. कित्ता
४. मदालसा, 'स्मृती संगम', सस्ता साहित्य प्रकाशन, दिल्ली, १९७२, पृष्ठ ३५.
५. शिखरे दा. न., विनोबा जीवन मंत्र, चित्रशाळा प्रकाशन, पुणे १९८८ पृष्ठ ७८.
६. मदालसा, पृ. २८०
७. कित्ता, पृ. ६७.

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF ) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 73 :
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
November-2018

८. किल्ता, पृ. ५८.
९. शिखरे, पृ. ७६
१०.भावे शिवाजी, 'विनोबा चरीत्र', परंधाम प्रकाशन, पवनार, १९९५, पृष्ठ ७२.
११.शिखरे, पृ. ११७
१२.बजाज रामकृष्ण (संपा.), 'जमनालाल बजाज की डायरी खंड ३', सस्ता साहित्य प्रकाशन, दिल्ली, १९६९, पृष्ठ ११०.
१३.शिखरे, पृ. २६.
१४.किल्ता, पृ. १८६
१५.किल्ता, पृ. ५७.
१६.मदालसा, पृ. २६७
१७.दिवाण मनोहर, 'परंधामचे पवनार', ग्राम सेवा प्रकाशन., नालवाडी, १९९४, पृष्ठ. १९.
१८.विनोबा, 'स्नेह सन्निधी,' परंधाम प्रकाशन, पवनार, २००७, पृष्ठ. ३४०.
१९.शिखरे, पृ. ७१.
२०.कालेलकर काका (संपा.) 'पाचवे पुत्र को बापू के आशीर्वाद', नवजीवन मंदिर प्रकाशन, १९७२, अहमदाबाद, पृष्ठ. ४.
२१.भूदानयज्ञ, १६ मार्च, १९६२, पृ. ४.
२२.विनोबा, 'विनोबा साहित्य खंड १९', परंधाम प्रकाशन, पवनार, १९९६, पृष्ठ. ४६१.
२३.बजाज कमलनयन, 'काकाजी बापू विनोबा', सस्ता साहित्य प्रकाशन, दिल्ली, १९६८ पृष्ठ. २१२
२४.२४) विनोबा, 'वि.सा.खं. १९', पृ. ४६७
२५.जानकीदेवी, 'मेरी जीवन यात्रा', सस्ता साहित्य मंदिर प्रकाशन, दिल्ली, १९७२ पृष्ठ. ५